# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना :-</u>** प्रभाग क्र. २० मधील गोळीबार चौक ते मस्कासाथ
**{सा.बां.वि. झोन क्र. ०७ }** चौक ते मारवाडी चौक येथे रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास सन २०२२—२३ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात पद क्र. A22001330803 मधून रू. १,३५,९६,४९७/— राशीची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली असून प्रस्तुत कामास SE/PWD/TS/74/22-23, Dt. 28/06/22 अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. तरी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१. प्रस्तुत कामास SE/PWD/TS/74/22-23, Dt. 28/06/22 अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

२. प्रस्तुत कामाकरिता सन २०२२—२३ चे आय—व्यवकातील पद क्र. A22001330803 (पंडित दिनदयाल उपाध्याय अंतर्गत रस्ते सुधार कार्यक्रम) प्रावधान प्राप्त आहे.

३. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 67/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 11/08/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, झोन क्र. ०७ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २० मधील गोळीबार चौक ते मस्कासाथ चौक ते मारवाडी चौक येथे रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास सन २०२२—२३ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात पद क्र. A22001330803 मधून रू. १,३५,९६,४९७/— राशीची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली असून प्रस्तुत कामास SE/PWD/TS/74/22-23, Dt. 28/06/22 अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. तरी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**